



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १७४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०४ फेब्रुवारी २०२५


## थोडक्यात

### नवनाथ वाळुंज यांच्या उपोषणाला यश

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२, आळेफाटा(पुणे) :** आळेफाटा बस स्थानकात दिनांक ३० जानेवारी २०२४ पासून नवनाथ दादाभाऊ वाळुंज अन्नत्याग उपोषणासाठी बसले होते. तरी तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन म हामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आळेफाटा बस सथानकाची शासकीय मोजणी करून हद्द निश्चिती करून अतिक्रमणे काढले जातील व संपूर्ण बस स्थानकाला रक्षण भिंत उभारली जाईल सर्व प्रक्रिया ९० दिवसांच्या आत पूर्ण केली जाईल असे लेखी आश्वासन नारायणगाव आगार प्रमुख वसंत आरगडे यांचेकडून पाठविले असल्याने नवनाथ वाळुंज यांनी चालू असलेले उपोषण तिसऱ्या दिवशी स्थगित केलेले आहे, तरी याप्रसंगी ग्रामपंचायत जेष्ठ सदस्या वैशाली देवकर, निर्शा वाळुंज, संदीप गडगे, संतोष पादिर, वडगाव आनंद गावचे जेष्ठ नागरिक व माजी सरपंच रघुनाथ चौगुले, अविनाश चौगुले, राजू लोखंडे, वडगाव आनंद चे पोलीस पाटील दत्ता पाटील चौगुले, वडगाव आनंद वि. वि.का.सोसायटीचे संचालक निमेश वाळुंज, गणेश गोफणे, दत्ता कुऱ्हाडे, महेंद्र कबीर, विपुल येलमर, लाखन जंगम, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय वाळुंज, दिनेश कुऱ्हाडे, अतुल चौगुले, सचिन देवकर, किसन चौगुले, दिलीप चौगुले, पंकज चौगुले, जयेश जंगम, आकाश देवकर, ॲडव्होकेट रवींद्र नायकोडी यांचेसह आदी ग्रामस्थ मित्र परिवार मोठ्या प्रमाणात उपस्तीत होते.

### कोकण रेल्वेच्या दोन गाड्यांचे डबे वाढले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या दोन रेल्वेगाड्यांच्या संरचनेत बदल करण्यात आला असून दोन्ही रेल्वेगाड्यांचे प्रत्येकी दोन डबे वाढले आहेत. हजरत निजामुद्दीन-तिरुवनंतपुरम सेंट्रल – हजरत निजामुद्दीन त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेस आणि हजरत निजामुद्दीन –मडगाव – हजरत निजामुद्दीन द्वि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला प्रथम श्रेणीचा वातानुकूलित डबा आणि तृतीय श्रेणीचा वातानुकूलित डबा असे दोन डबे कायमस्वरूपी जोडण्यात येणार आहेत. कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक १२४३२ हजरत निजामुद्दीन-तिरुवनंतपुरम सेंट्रल त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ४ फेब्रुवारीपासून तर, गाडी क्रमांक १२४३१ तिरुवनंतपुरम सेंट्रल-हजरत निजाम द्दीन त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ६ फ ब्रुवारीपासून डबे जोडण्यात येतील.

# अर्थसंकल्प केवळ लोकांचा, लोकांसाठी : सीतारामन

## पंतप्रधान यांच्या आग्रहामुळेच मी करकपात केली...





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, नवी दिल्ली :** लोकांकडून, लोकांसाठी, लोकांचा अर्थसंकल्प असे वर्णन करत मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा दिला, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी दिलेल्या मुलाखतीत सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे म ध्यमवर्गासाठी करकपात करण्याच्या बाजूने आधीपासूनच आग्रही होते. मात्र कर अधिकाऱ्यांना करकपातीची गरज समजून देण्यासाठी वेळ लागला, असे सीतारामन म्हणाल्या.

देशात प्रामाणिक करदाते असून, त्यांच्या आकांक्षा पूर्ण होत नसल्याबद्दल तक्रार करणाऱ्या मध्यम वर्गीयांचा आवाज आम्ही ऐकला आहे. करदात्यांसह मध्यमवर्गीयांवरील महागाईसारख्या घटकांचा परिणाम मर्यादित करण्यासाठी सरकारने अधिक प्रयत्न करावेत अशी इच्छा असल्याने, पंतप्रधानांनी दिलासा देण्याचे मार्ग शोधण्याचे काम तातडीने केले, असे सीतारामन यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांनी कर सवलतीसाठी तत्परतेने सहमती दर्शवली असली तरी, कल्याणकारी आणि इतर योजनांसाठी म हसूल संकलन सुनिश्चित करण्याचे काम असलेल्या अर्थ मंत्रालयातील अधिकाऱ्यांना आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाला (सीबीडीटी) पटवून देण्यासाठी थोडा वेळ लागला, असे त्यांनी आवर्जून सांगितले. शनिवारी सलग आठवा अर्थसंकल्प सादर करताना, सीतारामन यांनी मध्यमवर्गाचा भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असल्याचे सांगून या अर्थसंकल्पात मध्यमवर्गासाठी करात भरघोस सवलत सुचविली. पगारदारांना भरघोस म्हणजे पावणेतेरा लाखांइतके वार्षिक उत्पन्न करमुक्त होणार असल्याची घोषणा केली. कररचनेत बदल करताना फक्त नवीन करप्रणालीनुसार कर भरणाऱ्या करदात्यांसाठीच करमुक्त उत्पन्नाची मर्यादा ७ लाख रुपयांवरून थेट १२ लाख रुपयांपर्यंत वाढवली. करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत थेट ५ लाख रुपयांची वाढ ही आतापर्यंतची सर्वात मोठी वाढ आहे.

हा लोकांचा लोकांना हवा असलेला अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पाच्या नीतिमत्तेचे वर्णन त्यांच्या स्वत:च्या शब्दांत करताना त्या म्हणाल्या, अब्राहम लिंकनच्या शब्दांत लोकशाहीत म्हटल्याप्रमाणे, हा लोकांचा, लोकांसाठीचा अर्थसंकल्प आहे. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवल्यामुळे त्यांच्या हाती अधिक पैसे राहतील, ज्यामुळे देशांतर्गत वस्तू-सेवांची मागणी, बचत आणि गुंतवणूक वाढेल.

# दिराने विधवा वहिनीचे लग्न जुळविले

## पित्याच्या भूमिकेत कन्यादानही केले




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, बुलडाणा :** मोठ्या दिराने आपल्या विधवा भावजयीचे नुसते लग्नच जुळविले नाही तर पित्याची भूमिका वठवीत तिचे 'कन्यादान' देखील केले. विशेष म्हणजे, दोन मुलींची आई असलेल्या विधवेशी लग्न करणाऱ्या युवकाचे हे पहिलेच लग्न होय. त्यामुळे या सामाजिक क्रांतीत वर पक्षाने देखील महत्वाची भूमि का वठविली, हे येथे उल्लेखनीय. बुलढाणा तालुक्यातील भादोला येथील वसंत निकम यांनी हा सामाजिक आदर्श उभा केला.

**थाटात पार पडले लग्न !**

भावाच्या निधनानंतर विधवा झालेल्या वहिनीसाठी वसंत निकम या दिराने पित्याची भूमिका घेतली. विधवा विवाहसाठी लोकचळवळ उभारणारे म ानस फाऊंडेशनचे दत्तात्रय लहाने यांच्या माध्यमातून कुटुंबाची मानसिकताही तयार केली. तसेच मुलीच्या आई-वडिलांनाही विश्वासात घेतले. योग्य अनुरूप जोडीदार शोधून थाटामाटात लग्नही लावून दिले. स्थळ शोधण्यापासून सर्व सोपस्कार पार पाडले व शेवटी बाप म्हणून वहिनीच्या पाठीशी ठामपणे उभे राहून कन्यादानही केले.

वसंत निकम यांचे लहाने बंधू विजय यांचे पाच वर्षांपूर्वी निधन झाले. त्याम ुळे कमी वयात त्यांच्या वहिनी संजना यांच्यावर वैधव्याचा डोंगर कोसळला. विजय – संजना यांना दोन मुली झाल्या. मात्र विजय यांच्या जाण्यामुळे संजना निकम यांचे आयुष्यच उदध्वस्त झाले. सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत वसंतरावांनी पुढाकार घेत त्यांच्या पत्नी आशा यांच्या मदतीने विधवा वहिनी संजनासाठी स्थळ शोधण्याचा विचार केला. निकम यांनी लहाने यांना आपला विचार बोलून दाखविला.लहाने व वसंतराव निकम यांनी हा विवाह पार पाडला.

खामगाव जवळील मोहाडी येथे हा विवाह सोहळा पार पडला. नवरदेव सतीष परिहार (अमडापूर, तालुका चिखली) यांचे हे पहिले लग्न असून त्यांनी दोन म ुलींनाही स्वीकारले.

प्रा. शहीना पठाण डॉ. निकम, संजनाचे वडील सुखदेव भुसारी, आई द्वारकाबाई, सामाजिक कार्यकर्ते अनिल इंगळे, हिरालाल जैन, वानखेडे व शंकर भाऊ हे या अनोख्या विवाहाचे साक्षीदार ठरले. या सोहळ्यामध्ये सर्व सोपस्कार वसंतरावांनी पार पाडले.

# कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत ठाणे शहरला अंतिम विजेतेपद



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०३, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आयोजित, नांदेड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या सहकार्याने, ग्रामपंचायत कार्यालय हटक्याळ, तालुका कंधार, जिल्हा नांदेड, यांच्या वतीने आयोजित, निमंत्रित जिल्हा कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा दिनांक ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत, हटक्याळ, तालुका कंधार जिल्हा नांदेड येथे, मॅटवरील कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ठाणे शहर कुमारगट या संघाने अंतिम विजेतेपद संपादन केले. एकाच वर्षात सलग दुसऱ्यांदा ठाणे शहर कुमार गटाच्या संघाने विजेतेपद संपादन केले त्याबद्दल सर्व खेळाडूंचे, प्रशिक्षक, व्यवस्थापकाचे सर्वांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

# भूमिपुत्र संघटनेच्या अभियानाला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद

## पारनेरमध्ये घडणार मोठी क्रांती...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील भूमिपुत्र शेतकरी संघटनेने दुष्काळी गावांना हक्काचे पाणी मिळण्यासाठी विडा उचलला आहे. तसेच हक्काचे पाणी मिळण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटना व पारनेर तालुका पाणी संघर्ष समितीच्या वतीने संस्थापक संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली गाव तिथे कृती समिती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. तसेच गावोगावी शेतकऱ्यांची एकजूट होताना दिसत आहे. बहुतांश गावात कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. नुकतेच शहांजापूर व पळवे बुद्रुक येथे देखील कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची एकजूट होताना दिसत असल्याने आगामी काळात पारनेर तालुक्यात मोठी क्रांती घडण्याची शक्यता आहे.

दरम्यान यावेळी संतोष वाडेकर, संतोष वाबळे, बाळशिराम पायमोडे, मोहन रोकडे, सुभाष पाटील करंजुले, राहुल गुंड, गोरख पठारे, रघुनाथ मांडगे, प्रमोद गवळी, अण्णा मोटे, देविदास मोटे, साहेबराव म्हस्के, उत्तम बेंद्रे, किसन म्हस्के, बापु म्हस्के, सबाजी जरे, बाबा म्हस्के, बाळू म्हस्के, रामदास मोटे, प्रमोद सोनवणे, बाबा म्हस्के, चेअरमन किसन कळमकर, ग्रा.सदस्य संपत पळसकर, संतोष मोरे, विठ्ठल कळमकर, राजू जाधव, विजू कळमकर, बाळासाहेब पळसकर, योगीराज जाधव, तात्याभाऊ पवार,गोरख म्हस्के, देवा मोटे, दत्तू म्हस्के, संजय जरे, वसंत मोटे, दत्तात्रय मोटे, संकेत म्हस्के, बेंद्रे रतन, प्रमोद सकट, जगन्नाथ सकट, गोरख जाधव, अजय म्हस्के, शुभम म्हस्के, संभाजी पावडे, अविनाश म्हस्के, भाऊसाहेब म्हस्के मच्छिंद्र मोटे, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साई संस्थानच्या २ कर्मचाऱ्यांची अमानुषपणे हत्या !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, शिर्डी (अहिल्यानगर) :** जिल्ह्यात एक धक्कादायक अशी घटना शिर्डीत घडलेली असून शिर्डी संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांची अडवून अत्यंत अम ानुषपणे हत्या करण्यात आलेली आहे तर आणखीन एक व्यक्ती देखील हल्ल्यात जखमी झाला आहे. विशेष बाब म्हणजे तीन वेगवेगळ्या ठिकाणी अवघ्या एक तासांच्या आत घडलेल्या असून शिर्डीत यामुळे खळबळ उडालेली आहे.

> खासदार डॉक्टर सुजय विखे यांनी देखील याप्रकरणी संताप व्यक्त करत, पोलिसांना अपघात आणि खून यातील फरक कळत नाही, त्याला पोलिसात राहण्याचा अधिकार नाही. त्याच्या निलंबनासाठी पोलीस अधीक्षकांशी बोललो आहे. पोलिस निरीक्षक यांच्यावरही कारवाई करण्यात येईल. शिर्डीची गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलण्यात येतील. येथिल पोलिस व्हीआयपी दर्शन प्रोटोकॉलमध्ये व्यस्त असतात त्यामुळे प्रोटोकॉलसाठी स्वतंत्र पोलिस देण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे आग्रह धरून हा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात येतील असे विखे पाटील यांनी म्हटले आहे.

शिर्डी त आज पहाटेच्या सुमारास सुभाष साहेबराव घोडे आणि नितीन कृष्णा शेजुळ हे साई संस्थानमध्ये निघाले होते त्यावेळी आरोपींनी वाटेत अडवून त्यांची निर्घृण हत्या केली तर आणखीन एका हल्ल्यात कृष्णा देहरकर हा तरुण जखमी झाला असून त्याच्यावर श्रीकृष्णनगर भागात हल्ला झाला आहे. पहाटे चार ते साडेपाच दरम्यान विम ानतळ रोडला हे तीन गुन्हे घडले असून अत्यवस्थ असलेले कृष्णा देहरकर यांच्यावर प्रवरानगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सुभाष घोडे हे मंदिरातील साईमंदिरातील कर्मचारी ड्युटीवर येत होते तर नितीन शेजुळ हे सुरक्षा कर्मचारी ड्यूटी संपवून घरी निघाले होते तर कृष्णा देहरकर हे मुलाला सोडून घरी निघाले होते त्यावेळी या घटना घडलेल्या आहेत. मोटारसायकलवर असलेल्या दोघांनी चोरीच्या उद्देशाने तिघांना वेगवेगळ्या वेळेत अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली मात्र इतक्यावरच न थांबता विकृत मनोवृत्तीतून आरोपींनी या तीनही निरपराध नागरिकांवर चाकूनं असंख्य वार केले त्यात दोघांचा जागेवरच मृत्यू झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे पोलिसांनी अपघात असल्याचे सांगत स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला असाही आरोप मयत व्यक्तींच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.

# संपादकीय



## फेसबुकचा वाढदिवस!

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २१ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज फेसबुकचा एकविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या दोनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २१ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास बारा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. फेसबुकला २१ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# सूर्यनमस्कार - शारीरिक सर्वांगीण विकास



हिंदू धर्मात सूर्याला देवता मानतात. सूर्याला धार्मिक आध्यात्मिक वैज्ञानिक दुष्टीकोनातूनही खूप महत्व आहे. समस्त मानव व प्राणीमात्रासाठी आवश्यक अन्नउत्पादन प्रक्रियेसाठी सूर्याची अत्यंत महत्वाची भूमिका आहे.सूर्यउपासणेवेळी सकाळी लवकर उठून सूर्याला एका लोट्यामध्ये पाणी घेऊन अर्घ्य देतात. नमस्कार करतात. सूर्याला आपल्या दैनंदिन जीवनामध्ये सुद्धा खूप महत्त्व आहे. सकाळचे सूर्यदर्शन म्हणजे दारिद्र्य, आळस घालवणे होय.

खेड्यापाड्यात अजूनही शेतकरी, मजूर वर्ग हा सूर्योदयापूर्वी उठून आपले दैनंदिन कार्य उरकतात.जसे की, सकाळी उठून सर्वप्रथम आपल्या शेतात जाऊन गुरे ढोरे यांचा गोठा साफ करतात, त्यानंतर चारा पाणी देऊन गाई म्हशींचे दूध काढतात. दूध डेअरीवर नेऊन पोहोचवतात वगैरे,अर्थात सूर्य हा नव विचार,ताजेपणा व आरोग्यदायी जीवनाचे प्रतीक आहे. सूर्याला नमस्कार करणे हे आपल्या पुराण व शास्त्रामध्ये सुद्धा उल्लेखित आहे. सूर्याला बारा नावे असून, मित्र,खर्ग,हिरण्यागर्भ, आदित्य,अकार्य, रवय, भानव, पुष्प, मरीच,सविता, भास्कर असे म्हटले जाते.सूर्य मंत्र उच्चारून आजही कित्येक लोक उगवत्या व मावळत्या सूर्याला नमस्कार करतात.

सूर्यनमस्कार हा योगाचा प्रकार आहे. सूर्यनमस्कराने शरीराचा चांगल्या प्रकारे व्यायाम होतो. सकाळी सूर्योदयासमयी व्यायाम प्रकार केल्या जातो व त्याने शरीराचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.सूर्यनमस्काराच्या आसनाचे जवळपास ३२ प्रकार सांगितलेले आहे.पौराणिक काळापासून तर आतागायत शरीर शौष्टव करण्यासाठी सुर्यनमस्कार उत्तम व्यायामप्रकार आहे. सूर्यनमस्काराने आरोग्य, दीर्घायुष्य व कार्यक्षमता वाढते. शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराज व इतर मावळे सुद्धा सूर्यनमस्कारासोबत इतर प्राणायाम व व्यायाप्रकार करून आपले सदृढ व पिळदार युद्धासाठी वापर करत असत. केवळ शरीर सदृढच नाही तर मनोधैर्य वाढते.

मनोबल विकसित होते. याचा वापर युद्ध कलेसाठी वापरल्या जात असे.त्याच धर्तीवर या काळातही भरती प्रक्रियेमध्ये सूर्य नमस्कराला महत्त्व आहे,म्हणून आखाडे,व्यायाम शाळा, सैनिक प्रशिक्षण केंद्र येथे सूर्यनमस्कार व इतर व्यायाम प्रकाराचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणातून युवक स्वतःचे शरीर सदृढ करतात, त्याचा उपयोग भरती प्रक्रियेमध्ये होतो.देशाचे सैनिक व राज्य शासनाचे कर्तव्यदक्ष पोलीस या पदावर नोकरी करून राष्ट्राचे रक्षण व सुव्यवस्था राखण्यास मदत करतात.

सध्याच्या काळात शरीरशोष्टव स्पर्धेचे आयोजन केल्या जात आहे,निकषानुसार विजेता निवडला जातो. सूर्यनमस्कार या व्यायाम प्रकारामुळे शरीराचे सौंदर्य पिळदार होत असल्यामुळे त्याचा फायदा तरुणांना होतो. अशा अनेक क्षेत्रांमध्ये जशी की, मल्लखांब, कुस्ती,कबड्डी,खो-खो,क्रिकेट, धावण्याची स्पर्धा असो वा कुठल्याही मैदानी खेळाच्या स्पर्धेमध्ये सूर्यनमस्कार हा व्यायाम प्रकार उपयोगात येतो. युवकांचे मार्गदर्शक स्वामी विवेकानंदांनी सुद्धा व्यायामाचे महत्त्व सांगितले आहे. त्यामध्ये सुद्धा सूर्यनमस्काराला विशेष महत्त्व आहे कारण त्यामुळे शरीराचा सर्वांग व्यायाम होतो.

अशाप्रकारे सूर्यनमस्काराने आरोग्य चांगले राहते. मनोबल वाढते. स्मरणशक्तीचा विकास होतो.आपल्या भारतीय संस्कृतीचे अनुकरण करून संपूर्ण जगामध्ये सूर्यनमस्कार दिन साजरा करतात. आपल्या भारताने जगाला अशा प्रकारचे आरोग्य हित व नितीतिमत्याचे ज्ञान दिले आहे,म्हणून भारत देश हा भाग्यविधाता हे जगाच्या गुरुस्थानी आहे. म्हणून तरुणांनी व्यसनाकडे न वळता राष्ट्र विकास,रक्षण येणाऱ्या आपल्या शरीर सुदृढ करणे गरजेचे आहे. स्वहिताबरोबर राष्ट्रहित जोपासणे गरजेचे आहे.व्यायाम प्रकाराच्या सूर्यनमस्कार व्यायाम प्रकार बरोबर इतर योग - प्राणायाम अवलंब करून जगाला आरोग्याचे महत्त्व पटवून देऊन कायम गुरुस्थानी राहून आपल्या देशाचे नाव जगाच्या पाठीवर उच्च स्थानी झळकवायचे आहे.

**समस्त देशवाशीयांना**
**सूर्यनमस्कार दिनानिमित्त शुभेच्छा....!**
**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## घोडबंदर रोडवर रिक्षाचा भीषण अपघात



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.३, घोडबंदर (ठाणे) :** घोडबंदर रोड मार्गावर व्हेन्स हॉटेल जवळ भीषण अपघात झाला. एका चारचाकी कार ने एमएच ०४/जेक्यू ०६४८ क्रमांकाच्या रिक्षाला पाठीमागून जोराने धडक दिली, त्यामुळे ही रिक्षा समोरच्या बाजूला जाऊन ब्लॉकला जोरात धडकली. घटनास्थळी पोहोचून पोलिसांनी रिक्षा चालक आणि प्रवाशांना जवळच्या हॉस्पिटलला पाठविण्याची व्यवस्था केली. सदर घटनेत कोणतीही जीवित हानी झालेली नाही, परंतु रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. रिक्षा चालक व प्रवासी जखमी झाले आहेत. पोलीस पुढील कारवाई करीत आहेत.

## वाचक पत्र

### मंदिरांतील ड्रेसकोडचा विरोध निरर्थक !

देशभरातील कोट्यवधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या मुंबईतील श्रीसिद्धिविनायक मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी मंदिर व्यवस्थापनाने ड्रेसकोड लागू केल्याने तथाकथित पुरोगाम्यांना आणि नास्तिक विचारसरणीच्या मंडळींना पोटशूळ उठला आहे. देवाच्या दरबारात ड्रेसकोड लागू करते म्हणचे भाविकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा असल्याची भाषा यानिमित्ताने त्यांच्याकडून करण्यात येत आहे. ड्रेसकोड लागू करण्यामागील उद्देश जाणून न घेता अशा प्रकारची अज्ञानमूलक टीका करून ही मंडळी स्वतःचेच हसे करून घेत आहेत. समाजात ज्यांना आदराने आणि सन्मानाने पाहिले जाते अशा वैद्यक, न्याय, सुरक्षा आणि शिक्षण क्षेत्रातही ड्रेसकोड आहेत. काळा कोट घातल्याशिवाय न्यायालयात कोणताही वकील फिर्यादीची बाजू मांडू शकत नाही. न्यायाधीश सुद्धा त्यांना नेमून दिलेल्या ड्रेसकोडचे पालन करतात. रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यासाठी जाताना कोणत्या रंगाचा आणि कोणत्या प्रकारचा गणवेश घालावा हेसुद्धा डॉक्टरांना ज्ञात आहे. पोलिसांनाही सेवेत असताना प्रशासनाने ठरवून दिलेला गणवेश परिधान करावाच लागतो. देशाचे रक्षण करणाऱ्या सैन्यालाही ड्रेसकोड दिलेला आहे. मुलांवर योग्य संस्कार व्हावेत यासाठी आतातर शिक्षकांनाही ड्रेसकोड लागू करण्यात आला आहे. मंदिरातील ड्रेसकोडवर बोंबलणारी मंडळी आपल्या मुलांना शाळेच्या गणवेशातच शाळेत पाठवतात ना ? रुग्णालयात गेल्यावर परिचारिकेने गणवेश परिधान नाही केला तर आपण तरी त्यांना ओळखू शकतो का ? रिक्षा टॅक्सी चालकांनी त्यांना नेमून दिलेला वेष परिधान नाही केला तर त्यांनाही दंडाला सामोरे जावे लागते. व्यवहारातील लहान सहान बाबींत आपल्याला ड्रेसकोड मान्य आहे, तर देवाच्या दरबारात जाताना आपली बुद्धी एव्हढी निरर्थक का चालावी ? देवाचा दरबार अर्थात मंदिरे ही काही पर्यटनाची ठिकाणे नाहीत की तिथे कोणत्याही वेशात जाऊन मौजमजा करावी. मंदिरात जाताना तेथील पावित्र्याचा लाभ आपल्यासह इतरांनाही व्हावा यासाठी लागू करण्यात आलेला ड्रेसकोड खरेतर भाविकांच्याच हिताचा आहे त्यामुळे त्याला विरोध करणे निरर्थक आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## म्हाते खुर्द येथे महिला मेळावा संपन्न

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२, मेढा (जावली) :** म्हाते खुर्द येथे नुकताच महिला मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमास सातारा जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अधिकारी श्रीमती शनमुक मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी उपस्थित महिलांना स्वच्छता व पाणी या विषयावर विशेष व्याख्यान देवून पाणी आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. तसेच ब्रह्मकुमारी धनश्री बहीण यांच्याही अध्यात्मिक व्याख्यानाचा लाभ यावेळी महिलांना झाला. महिलांकडून योग व मेडिटेशन याची प्रात्यक्षिके करून घेतली गेली.या कार्यक्रमा दरम्यान मान्यवरांच्या हस्ते माझी वसुंधरा अभियानाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी माझी वसुंधरा लोगोचे अनावरण करण्यात आले.

प्लास्टिक वापर टाळा त्याऐवजी कापडी पिशव्या वापरा या सामाजिक संदेशाची जनजागृती करण्यासाठी म्हाते खुर्द गावचे गोवास्थित प्रसिद्ध व्यापारी श्री. प्रकाश हरिबा दळवी यांनी मोफत दिलेल्या ५०० कापडी पिशव्यांचे उपस्थितांना वाटप केले.स्मार्ट गाव म्हाते खुर्द गावची स्वच्छता, सुशोभिकरण, सामाजिक एकता, विविध अभियान उत्स्फूर्त सहभाग, विविध ग्राम स्पर्धांमधील गावचे घवघवीत यश, विविध विकास कामे पाहुन उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच राजाराम दळवी तसेच म्हाते खुर्द ग्रामस्थ व महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

## कुस्ती..

कुणाचे काय चूक
कुणी केली मस्ती
वेगळ्या कारणाने
गाजूनजाते कुस्ती

कसलेले पैलवान
पराजयाची धास्ती
रसिकाचा मूड बने
अपेक्षा करे जास्ती

गालबोट न स्पर्धेत
नको निंदा नालस्ती
अतिउत्साह अडवा
बॅरिकेड रस्तो रस्ती

कडक हवेय शासन
खपवू नये बेशिस्ती
सुयोग्य जेत्यालाचं
मिळो पत्रकप्रशस्ती

पंचांची जबाबदारी
नको मोडायं शिस्ती
सन्मान राखा खेळा
खिलाडूवृत्ती चिस्ती

रंग बिघडून टाकती
राजकारणाचीवस्ती
गैरव्यवहारमूठमाती
विसर्जीत करेअस्ती

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# कर्करोग: प्रतिबंधात्मक आजार!

जागतिक कर्करोग दिन हा दि.४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय दिवस आहे. जागतिक कर्करोग दिन सन २००८मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या नेतृत्वात आहे. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे, हे आहे आणि कॅन्सरपासून बचाव करता येणाऱ्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संधी आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहितीला लक्ष्य करतो, जागरूकता वाढवतो आणि कलंक कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने प्रभावित झालेल्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. यापैकी एक चळवळ आहे नो हेअर सेल्फी, कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी धैर्याचे प्रतीक दर्शविण्यासाठी केशकर्तनकर्त्यांनी त्यांचे डोके शारीरिक किंवा अक्षरशः मुंडन करण्याची जागतिक चळवळ आहे. सहभागींच्या प्रतिमा नंतर सर्व सोशल मीडियावर शेअर केल्या जातात. जगभरात शेकडो कार्यक्रमही होतात.

जागतिक कर्करोग दिनाची स्थापना दि.४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद, जी संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रूग्ण सेवा सुधारण्यासाठी तयार करण्यात आली होती, त्यामध्ये दस्तऐवजाच्या अधिकृत स्वाक्षरीची वर्धापनदिन जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, त्यावर तत्कालीन जनरल यांनी समिटमध्ये स्वाक्षरी केली होती. कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. पॅरिस येथे सन २०००मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी पॅरिसच्या कर्करोगविषयक सनदेला मान्यता दिली. प्रस्तुत सनद कर्करोगसंबंधित संशोधन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता आर्थिक गुंतवणूक करणे, कर्करोगग्रस्त रूग्णांचे जीवनमूल्य उंचावणे तसेच त्यांना योग्य उपचार देणे अशा तत्त्वांचा पुरस्कार करते. सनदेच्या दहाव्या कलमात अधिकृतरीत्या ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून जाहीर केला गेला. कर्करोगविषयक उपलब्ध माहिती तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यांत झालेली लक्षणीय प्रगती यांमुळे रोगप्रसारामध्ये कपात होणे अपेक्षित आहे. परंतु जागतिक आकडेवारीनुसार दरवर्षी कर्करोगाचे नव्याने निदान होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत भर पडत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, कर्करोगाच्या माहितीचा प्रसार करून कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येऊ शकते. यासाठी कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरातील कर्करोग संस्था आणि आरोग्य संघटना जागतिक कर्करोग दिवस साजरा करतात. कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू हे अल्पविकसित देशांमध्ये होत असल्याकारणाने अशा ठिकाणी कर्करोग आणि त्याचा प्रतिबंध याबद्दल जनजागृती करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवस हे एक महत्त्वाचे साधन आहे. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना- युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोल- यूआईसीसी ही संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्करोगावर नियंत्रण राखण्यासाठी आणि पर्यायाने जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिवसाचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना जागतिक कर्करोग दिवसानिमित्त कर्करोगाशी निगडित रूपरेखा- थीम्स जाहीर करते. या रूपरेखेला अनुसरून विविध आरोग्य संस्था आणि कर्करोग उपचार केंद्र यांद्वारे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. या संस्थांद्वारे त्यांच्या संकेतस्थळांवर कर्करोगाविषयी माहिती प्रसारित केली जाते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना स्थानिक आरोग्य संस्थांच्या साहाय्याने संमेलने, व्याख्याने, प्रदर्शने तसेच निधी उभारणी कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही देशांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमांद्वारे ४ फेब्रुवारी किंवा त्या आठवड्यात कर्करोगविषयक विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात.

जागतिक कर्करोग दिवसानिमित्त सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांतून कर्करोगाचा जनजीवनावरील परिणाम कमी करता येऊ शकतो, या आशयाशी संलग्न रूपरेखा आखण्यात आली. तसेच कर्करोगाबाबत गैरसमज दूर करणे; कर्करोग हा प्रतिबंधात्मक आजार आहे; कर्करोगाविषयी वैयक्तिक बांधीलकी, अशा विविध विषयांना अनुसरून देखील रूपरेखा योजण्यात येतात. भारतामध्ये सन २०१४ पासून ७ नोव्हेंबर यादिवशी राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिवस साजरा करण्यात येतो.

**!! जागतिक कर्करोग दिनानिमित्त सर्वांना दक्षतावर्धक हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

